
सभासदांनो, बँकेच्या काही सभासदांनी, संचालक मंडळास विनंती केली की, मुस्लीम सहकारी बँकेच्या सहकार्यामुळे, त्यांना जे आर्थिक यश, सुबत्ता आणि स्थिरता मिळाली आहे, त्यांचा गोषवारा, त्यांना अहवालात त्यांचे मनोगत व्यक्त करून जाहीर करावयाचा आहे. त्यांच्या विनंतीला मान देऊन खाली काही ग्राहकांचे मनोगत छापित आहोत.



आम्ही, मेहबूब याकुब शेख, याकुब मौला शेख, शब्बीर याकुब शेख आणि रफिक शेख, अशा चौघांनी मिळून न्यु लकी फर्निचर या नावाने रेडीमेड फर्निचर आणि सुतार कामाचा व्यवसाय सुरू केला होता. परंतु केवळ गरजे पुरतेच उत्पन्न प्राप्त होत होते. सन २००० मध्ये, ख-या अर्थाने आपल्या बँकेशी आमचा, आर्थिक संबंध प्रस्थापित झाला. सुरुवातीला केवळ काही लाख रूपये लोन घेऊन आम्ही व्यवसाय वृद्धीस प्रारंभ केला. आणि चमत्कार घडल्या प्रमाणे आमचा व्यवसाय फोफावला. आज मितीस आमच्या व्यवसायाची उलाढाल करोडो रूपयां मध्ये असून मुस्लीम बँकेच्या केवळ कर्ज पुरवठाच नव्हे, तर इतर व्यावसायिक गोष्टींचे मार्गदर्शन - तेही विना मोबदला मिळाल्या मुळे आम्ही हे यश गाठू शकलो हे जाहीर करण्यास आम्हांस आनंद होतो.

मेहबूब शेख - (पार्टनर न्यु लकी फर्निचर )



मी, शंकर हनुमंत ढावरे, हडपसर शाखेचा खातेधारक. सन २००८ मध्ये योगायोगाने एका सामाजिक कार्यक्रमात माझी आणि बँकेच्या अध्यक्षांची भेट झाली. भेटीत ऐकमेकाच्या व्यवसायाबद्दल चर्चा चालू असताना, एका कार्यकर्त्याने श्री.शफी दिल्लीवाला हे मुस्लीम सहकारी बँकेचे अध्यक्ष असल्याचे मला सांगितले. तो पर्यंत ते बँकेचे अध्यक्ष आहेत हे मला माहीत नव्हते. चर्चे दरम्यान मी त्यांना माझ्या व्यवसायाच्या वाढीसाठी मार्गदर्शनाची विनंती केली. त्यांनी केवळ मार्गदर्शनच केले नाही तर बँके तर्फे मला आर्थिक पाठबळ ;अर्थात कर्जरूपाने आणि सर्व सोपास्कार पार पाडूनद्ध मिळवून दिले. या बद्दल मी त्यांचा अगदी व्यक्तीशः आभारी आहे. कारण कर्जफेड अगदी व्याजासहीत जरी करीत असलो तरी त्यांचे बँकींग कशी करावी आणि व्यवसाय कसा वाढवावा याचे मौलिक मार्गदर्शन मी कधीही विसरू शकत नाही. मी आज अभिमानाने सांगतो की मुस्लीम सहकारी बँक लि., पुणे ही केवळ बँक नसून सर्वांना मार्गदर्शन करणारी सामाजिक संस्था आहे.

शंकर ढावरे



जफर याकुब शेख

मी, जफर याकुब शेख आणि माझे बंधु आसिफ याकुब शेख, दोघांनी मिळून लोणावळा येथे मोठे मॉल आणि हॉटेल बांधन्याचे स्वप्न पाहिले. या कामी अनेक सोपास्कर पार पाडल्या नंतर, खरी अडचण आम्हां समोर भांडवल ;सुमारे ५ ते १० कोटीद्ध उभारण्याची आ वासून पुढे उभी राहिली. तेव्हा आम्ही आमची समस्या आमचे वडील याकुब शेख यांचेकडे मांडली. त्यावर त्यांनी एक क्षणही जावू न देता त्वरीत उत्तर दिले की तुम्ही आपल्या लोणावळा शहरातील मुस्लीम को-ऑप. बँके कडे चौकशी करा, माझ्या माहिती प्रमाणे या कामी मुस्लिम बँक तुम्हांस मदत करेल. आम्हा दोघा बंधूनी थोडया आशंकेनेच बँकेच्या लोणावळा शाखेशी संपर्क साधला. कारण सहकारी बँक मोठया प्रमाणावर कर्ज वितरण करील किंवा नाही याची खात्री नव्हती. लोणावळा शाखेतर्फे कर्ज घेण्याच्या प्रक्रिये विषयी आम्हांस सर्व सविस्तर माहिती देण्यात आली. आवश्यक ती कागदपत्रे, आणि इतर माहिती गोळा करण्या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. आणि या सर्व तयारी निशी आम्हांस पुण्यात मुख्यालयात, कर्ज का आणि कशासाठी हवे आहे याचे स्पष्टीकरण करण्यास सांगितले. मुख्यालयात बँकेचे अध्यक्ष, सचिव आणि इतर संचालकांशी भेट झाली. त्यांच्या कडून सर्व कागद पत्रांची तपासणी आणि पदजमतअपमू घेण्यात आला. सर्व बाबतींचा सुमारे १५ दिवस बँके कडून खुलासा मागतिला गेला आणि आम्हाला आमच्या गरजे पुरते कर्ज मंजूर करण्यात आले. आज लोणावळा सारख्या पर्यटन स्थळी आमचे मोठे मॉल व हॉटेल उभारले जात असून, आमचे हे स्पप्न मुस्लीम बँकेच्या सहकार्या शिवाय पूर्ण झाले नसते याची आम्हांस कायम जाणीव राहील. Thank You मुस्लीम बँक.



मी, शेख इब्राहीम अफजल, बँकेचा सन १९९४ पासून सभासद आहे. मी माझ्या, व्यवसायाची सुरूवात सन २००५ मध्ये पदवीधारण केल्यानंतर बॅटऱ्यांसाठी Distilled water manufacture करून ते पुरविण्याचे व्यवसाय सुरू केले आणि पुणे शहरा व्यतीरिक्त अन्य जिल्हयात माझे कार्यक्षेत्र वाढले. अशा रितीने व्यवसाय विस्तार झाला. जसा जसा व्यवसाय विस्तार होऊ लागला, तस तसे भांडवल कमी पडू लागले. या स्थितीत मी मुस्लीम बँकेचा भागधारक असल्याचे आठवले. मी बँकेच्या मुख्यलयात आलो. तेथे तत्कालीन अध्यक्ष श्री.पी.ए.इनामदार साहेबांशी भेट झाली त्यांनी मला तेथे मोलाचे मार्गदर्शन केले. मी त्यांना माझ्या व्यवसाय वाढी साठी आर्थिक भांडवल कमी पडत असल्याचे सांगितले असता, त्यांनी तिथल्या तिथे बँकेच्या सचिवांना बोलावून जर मी कर्ज प्रकरणा विषयी आवश्यक ती कागदपत्रे सादर करीत असेल आणि प्रत्यक्ष पाहणी नंतर सर्व व्यवस्थित दिसत असेल तर ताबोडतोब मला कर्ज देण्यास सांगितले. त्यांच्या या भूमिकेने आणि एकूणच मार्गदर्शनामुळे मला खूपच हुरुप आला आणि माझा आत्मविश्वासही वाढला. बँके कडून तेंव्हा पासून आजपर्यंत जशी गरज भासेल तसे, अर्थात बँकेच्या नियमां अधीन राहून मला वेळोवेळी वाढीव प्रमाणात पतपुरवठा होत आहे. आनंदाची बाब म्हणजे मी बँकेने मला ज्या व्यवसायासाठी कर्ज दिले आहे, तेवढयावरच न थांबता, मा.पी.ए.इनामदार साहेबांच्या मार्गदर्शना खाली इतर दुसरे मोठे व्यवसायसुद्धा सुरू केले आहे. जे केवळ माझ्या स्वतःच्या भांडवलावर उभे आहेत. मी इतरांना सुद्धा सांगू इच्छितो की कुठलाही संकोच न बाळगता, तुम्ही मुस्लीम बँकेच्या कार्य वाहकांस भेटा, तुमच्या सामाजिक व आर्थिक गरजा, खात्री लायक रित्या पूर्ण होतील.

शेख इब्राहीम अफजल
प्रोप. नोवा इंडस्ट्रिज



मी, अल्लाबक्ष असगर हुसेन शेख, बक्षी कन्ट्रक्शनचा मालक, व बांधकाम व्यावसायिक. सभासदांना ऐकून आश्चर्य वाटेल की मी काही काळापूर्वी एक साधासुधा रिक्षा चालक होतो. परंतु कर्मधर्म संयोगाने माझा मुस्लीम बँकेशी संपर्क आला. आणि माझे भाग्यच पालटले. नियतीने जणू सर्व जमवून मला आज एक यशस्वी बांधकाम व्यावसायिक बनविले. अर्थात आर्थिक सुबत्ता आली, नाव लौकीक वाढला. मी केवळ बँकेच्या कर्ज पुरवठया विषयीच आभारी नाही तर एकूणच बँकेतर्फे मिळणा-या सर्व बँकींग सेवां विषयी खुश आहे. RTGS, NEFT, Franking सुविधा आणि आता CORE Banking ची सोय, यामुळे मला आणि खात्रीने सर्वांनाच आवश्यक असलेली अत्याधुनिक बँकींग सेवा, आपण सर्वांनाच उपलब्ध झाली आहे.

मी बँकेच्या या सेवांसाठी आभारी आहे.

अल्लाबक्ष असगर हुसेन शेख